| MHLA150008222025 | **निशाणी क्र.५ खालील आदेश** (आदेश घोषित केला दि.२८.११.२०२५) |
| --- | --- |

प्रस्तुतचा अर्ज हा वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ३९ नियम १ व २ कलम १५१ आणि तदनुषंगिक तरतुदीप्रमाणे प्रतिवादी अथवा त्यांच्या तर्फे इतर इसमांनी वादीच्या मालकी कब्जेवहिवाटीस दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत हरकत अथवा अडथळा करु नये अशी तुर्तातुर्त मनाई प्रतिवादीविरुध्द व्हावी याकरिता केलेला आहे.

२. **मिळकतीचे वर्णन–**

मौजे– चापोली, ता. चाकूर, जि. लातूर येथील शेतजमीन मिळकत त्याचा गट नं. ५७७ क्षेत्र ०० हे २९ आर, यास चतुःसीमा खालीलप्रमाणे,

पूर्वेसः नांदेड लातूर रोड,

पश्चिमेसः राजुर पाणंद,

दक्षिणेसः होणाळीची शिव,

उत्तरेसः महानंदा शिवलींग गादगे यांची गट क्र. ५७८ मधील जमीन,

(सदर मिळकतीस दावा मिळकत असे संबोधणेत येईल)

३. वादीच्या कथनानुसार, वादीने नोंदणीकृत खरेदीखत क्र. १९६७/८९ अन्वये वाद मिळकत ही प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे मयत वडील व्यंकटी लक्ष्मण डोंगरे यांच्याकडून खरेदी घेतली आहे. तेंव्हापासून वादी सदर जमीनीचे मालक व कजेदार या नात्याने शांततामय रित्या जमीनीवर काबीज आहे. परंतू प्रतिवादी क्र. १ ते ३ व त्यांचे नातेवाईक हे वारंवार अडथळा, हस्तक्षेप निर्माण करीत आहेत. म्हणून वादीने दि.२२.०१.२०२५ रोजी प्रतिवादी क्र. १ च्या विरुध्द चाकूर पोलीस ठाणे येथे फिर्यादी जबाब दिला. त्यावरुन एन.सी. क्र. ६३/२०२५ ही प्रतिवादी क्र. १ ने वादीच्या शेतातील लिंबाचे झाड तोडून पाच ते सात हजार रु. चे नुकसान केल्याबाबत दाखल केले आहे. प्रतिवादी हे वादीच्या जमीनीमध्ये मेहनत व मशागीतचे काम करयास वारंवार बेकायदेशिर अडथळा निर्माण करीत आहेत.

४. वाद मिळकतीशी प्रतिवादींचा हक्कसबंध नसतांना जाणीवपुर्वक वादीला त्रास देण्याच्या उद्देशाने अडथळा निर्माण करीत आहेत, त्यामुळे वादीचे पैशाच्या स्वरुपात न भरुन निघणारे नुकसान होत आहे. दि.१४.०७.२०२५ रोजी वादी हे सालगडयासह मजूराच्या मदतीने वाद मिळकतीमध्ये सोयाबीन पिकाच्या कोळपणीचे काम करण्यासाठी गेले असता, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादीला अडवा अडवी करुन कोळपणीचे काम करण्यास मज्ञाव केला व अडथळा निर्माण केला. त्यामुळे वादीला दि. १४.०७.२०२५ रोजी प्रतिवादी विरुध्द दावा दाखल करण्याचे कारण उद्भवले.

५. वादीने आपला दावा सकृतदर्शनी स्वच्छरित्या मांडला आहे. दाव्याचा कौल हा वादीच्या बाजूने आहे. दाव्यात वादीस हमखास यशाची खात्री

आहे. त्यामुळे वादीने, अर्ज मंजूर करुन, प्रतिवादीविरुध्द तूर्तातूर्त मनाई हुकूम मिळण्याची विनंती केली,

६. प्रतिवादींनी नि.क्र. १५ नुसार जबाबदावा दाखल केला. त्यांनी असे कथन केले की, वादीने गट क्र. ५७७ आणि गट क्र. ५७३ मध्ये दावा मिळकती नोंदणीकृत खरेदीखत क्र. १९६७ /१९८९ द्वारे खरेदी केली आहे आणि त्यानुसार फेरफार क्र. १९९/८९ मंजूर झालेला आहे. प्रतिवादीने असे कथन केले की, गट क्र. ५७७ ची पुर्व बाजुची चतुःसिमा चुकीची नमुद केली आहे. गट क्र. ५७७ च्या पुर्व बाजुला गट क्र. ५७६ असून तो प्रतिवादी यांच्या नावावर आहे. गट क्र. ५७६ हा गट क्र. ५७७ व ५७३ या दोन्ही गटांच्या मध्ये आहे, तसे खरेदीखत १९६७/८९ मध्ये नमुद आहे. खरेदीखत क्र.१९६७ नोंदणीकृत करतांना गट क्र. ५७७ ची पुर्व बाजु लातूर नांदेड रोड आहे असे चुकीचे दर्शविलेले आहे. म्हणजेच गट क्र. ५७६ च्या पुर्वेला हा लातूर नांदेड रोड आहे.

७. प्रतिवादीने पुढे असे कथन केले की, गट क्र. ५७३/ख, याच्या पश्चीमेला खरेदीखत क्र. १९६७ मध्ये लातूर नांदेड रोड आहे हे बरोबर दर्शविलेले आहे. वादी हा राजकिय वर्तुळातील असून त्याचे नगरपरिषद चाकुरमध्ये देखील संपर्क आहेत. याउलट प्रतिवादी हा अशिक्षीत शेतकरी आहे. असे झालेले असू शकते की, वादीच्या वडीलांना जेंव्हा खरेदीखत नोंदणीकृत केले तेंव्हा तुकडेबंदी कायद्याची बाधा येऊ नये म्हणून त्यांनी खरेदीखत क्र. १९६७ मध्ये गट क्र. ५७७ च्या चतुःसिमा चुकीच्या दर्शविल्या. आता दावा मिळकतीच्या जवळ हाय वे गेल्यामुळे त्याची किंमत वाढलेली आहे. सबब, प्रतिवादीचा गट क्र. ५७७ हा

मिळविण्यासाठी वादीने सदरचा दावा दाखल केला आहे. प्रतिवादीने पुढे असे कथन केले की, वादी हा गट क्र. ५७७ च्या पुर्व बाजुने गट क्र. ५७६ वर अतिक्रमण करत आहे. वादीने फौजदारी तक्रार दाखल केलेली आहे परंतू प्रतिवादीची जमीन हडप करण्यासाठी सदरचा खोटा दावा दाखल केला आहे. वादी हा स्वच्छ हाताने न्यायालयात आलेला नाही, त्यामुळे त्याचा तुर्तातुर्त मनाईहुकूमाचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

८. उभयबाजूंची कथने व युक्तीवाद यावरुन या अर्जाच्या निकालासाठी खालील मुद्दे निघतात. त्यांची कारणमीमांसासह निष्कर्ष खालीलप्रमाणे –

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी हे सिध्द करतात काय की, सकृतदर्शनी केस हि त्यांच्या बाजूने आहे ? | **होकारार्थी** |
| २. | वादी हे सिध्द करतात काय की, न्यायाचा तराजू त्यांच्या बाजूने आहे ? | **होकारार्थी** |
| ३. | वादी हे सिध्द करतात का की, हा अर्ज मंजूर न केल्यास त्याचे अपरिमित न भरुन येणारे नुकसान होणार आहे ? | **होकारार्थी** |
| ४. | काय आदेश ? | **अंतिम** |

**आदेशाप्रमाणे**

**<u>–कारणमीमांसा–</u>**

९. उभयबाजूंकडुन आपआपल्या म्हणण्यापुष्ट्यर्थ काही कागदपत्रे दाखल करणेत आलेली आहेत. प्रकरण पुरावा पुर्व स्थितीस असल्याने अद्याप दस्त सिध्द होणे बाकी आहे परंतु, दोन्ही पक्षांनी दस्तावर ठेवलेली भिस्त विचारात घेतली असता सदर दस्त सिध्द होणे बाकी असतानाही त्यांचा विचार प्रस्तुत अर्ज निकाली काढताना करणेत येत आहे. तसेच, त्यांचा उल्लेख खालील विवेचनात संदर्भाप्रमाणे केलेला आहे. उभयबाजूंचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

**<u>मुद्दा क्र.१ ते ४ करीता</u> –**

१०. प्रस्तुत प्रकरणात वादीतर्फे विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, दावा मिळकतीवर वादीचा ताबा आहे. दावा मिळकत ही वादीच्या वडीलांनी नोंदणीकृत खरेदीखताने प्रतिवादीच्या वडीलांकडून विकत घेतली आहे. त्यानुसार फेरफार देखील झालेले आहे. प्रतिवादीने अडथळा केला आणि त्यानंतर वादीने फौजदारी तक्रार दाखल केली हे देखील प्रतिवादीने कबुल केले आहे. त्यामुळे दाव्याचा निकाल होईपर्यंत प्रतिवादीच्या विरुध्द तुर्तातुर्त मनाईहुकूमाचा आदेश देण्यात यावा.

११. प्रतिवादीतर्फे वकीलांनी युक्तीवाद केला की, वादी हा न्यायालयात स्वच्छ हाताने आलेला नाही. वादीने जाणुन बुजून त्याच्या मिळकतीचे क्षेत्र वाढवून गट क्र.५७६ मध्ये अतिक्रमण केलेले आहे. मुळात खरेदीखत क्र.

१९६७/१९८९ यामध्ये दावा मिळकतीच्या चतुःसिमा लिहीतांना चुक झालेली आहे. प्रतिवादीने आतापर्यंत वादीला कोणताही अडथळा केलेला नाही. प्रतिवादीने वादीचे दावा मिळकतवरील मालकीहक्क आणि ताबा मान्य केलेला आहे. त्यामुळेअंतरिम आदेशाची कोणतीही आवश्यकता नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

१२. दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १९०८ आदेश ३९ नियम १ च्या तरतुदीनुसार खालील प्रकारच्या प्रकरणांमध्ये न्यायालय तात्पुरत्या मनाईचे हुकूम देवू शकते, या तरतुदीनुसार, कोणत्याही दाव्यात शपथपत्रावरुन किंवा अन्यथा–

अ. एखाद्या दाव्यामध्ये कोणत्याही वादग्रस्त मालमत्तेचा, दाव्यातील कोणत्याही पक्षकाराकडून अपव्यय केले जाण्याचा, तिचे नुकसान केल्याचा किंवा ती अन्यत्रक्रमित केली जाण्याचा अथवा हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना तिची गैरपणे विक्री केली जाण्याचा धोका असल्याचे अथवा

ब. ––––

क. दाव्यातील कोणत्याही वादग्रस्त मालमत्तेच्या संबंधात प्रतिवादी, वादीला त्याचा कब्जा काढून घेण्याची धमकी देत आहे अथवा त्याविषयी अन्यथा वादीला क्षती पोचवत आहे.

असे सिध्द करण्यात आल्यास न्यायालयाला, दावा निकालात निघेपर्यंत किंवा पुढील आदेश दिला जाईपर्यंत अशी कृती निरुध्द करण्यासाठी आदेशाद्वारे

तात्पुरता मनाई हुकूम देता येईल किंवा अशा मालमत्तेचा अपव्यय, नुकसान, विक्री, ती हलविणे अथवा विल्हेवाट लावणे किंवा दाव्यातील कोणत्याही वादग्रस्त मालमत्तेच्या संबंधात वादीकडून कब्जा काढून घेणे किंवा अन्यथा वादीला क्षती पोचवणे या गोष्टीला स्थगित करण्याच्या आणि त्यांना प्रतिबंध करण्याच्या प्रयोजनासाठी न्यायालयाला योग्य वाटेल असा अन्य आदेश देत आहे.

१३. तात्पुरत्या मनाई हुकूमासाठी वादी यांच्या कडून प्रथमदर्शनी केस आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी न्यायालयाने या घडीला संपुर्ण पुरावा पाहणे अपेक्षित नाही. वादी व प्रतिवादी या दोघांनी शपथपत्र त्यांच्या अर्जास पुष्टी देणारे असे दाखल केलेले आहेत. या घडीला हे बरोबर नाही हे एक शपथपत्र ग्राह्य धरुन दुसरे ग्राह्य नाही असे म्हणावे. म्हणून दोन्ही पक्षातर्फे इतर कोणते प्रथमदर्शनी पुरावे आणलेल्या आहेत हे पाहणे महत्वाचे ठरते.

१४. वादीचा दावा मिळकतीवर प्रथमदर्शनी कब्जा आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी त्यांनी दाखल केलेली नि.४ वरील कागदपत्रांचे अवलोकन केले. खरेदीखत क्र. १६६७/१९८९ हा प्रतिवादीने देखील मान्य केला आहे. प्रतिवादीने वादीचा दावा मिळकतीवरील ताबा देखील मान्य केला आहे. यावरुन असे दिसून येते की, प्रथमदर्शनी वादमिळकतींवर वादीचा कब्जा आहे. म्हणून दावा मिळकतीवर वादीचा प्रथमदर्शनी असलेला ताब्याचे संरक्षण करण्याचा वादीस अधिकार आहे का याचा विचार या घडीला करणे गरजेचे आहे.

१५. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादीकडून त्यांच्या म्हणण्यामध्ये प्रतिवादीने हे मान्य केले आहे की, दावा मिळकत ही वादीने प्रतिवादीच्या वडीलांकडून खरेदीखताने विकत घेतली आहे. परंतू प्रतिवादीच्या कथनानुसार त्या खरेदीखतामध्ये दावा मिळकत गट क्र. ५७७ च्या चतुःसिमा चुकीच्या नमुद केलेल्या आहेत. परंतु, ही बाब संपुर्ण दावा चालल्यानंतर पुर्ण पुराव्यानिशी सिध्द होणारी गोष्ट आहे. या घडीला फक्त दावामिळकतीचा कब्जा प्रथमदर्शनी कोणाकडे आहे आणि त्याचे संरक्षण न केल्यास कोणाचे नुकसान होवू शकते हे पाहणे अपेक्षित आहे.

१६. वर नमुद केल्याप्रमाणे सद्यस्थितीला दावामिळकतीचा कब्जा हा प्रथमदर्शनी वादीचे हक्कामध्ये दिसून येत आहे. याउलट प्रतिवादी यांनी तसा कोणताही प्रथमदर्शनी पुरावा या कामामध्ये आणलेला नाही. उपलब्ध दावा कथनांचे व दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी प्रतिवादी क्र.१ व २ यांचे नांव लागलेले आहे. परंतु, प्रथमदर्शनी दावामिळकतीचा कब्जा वादीकडे दिसून येत आहे.

१७. प्रस्तुतच्या दाव्यामध्ये प्रतिवादीतर्फे गट क्र. ५७७, ५७६ इ. चा नकाशा दाखल केलेला आहे. परंतू गट क्र. ५७७ च्या चतुःसिमा चुकीच्या नमुद केल्या आहेत अगर नाही ही बाब सिध्द करणे ही प्रतिवादीची जबाबदारी आहे. अशा परिस्थितीत याचा निर्णय गुणदोषांवर दाव्याच्या अंती होणार आहे. परंतु, सद्यस्थितीला वादीच्या ताबा अथवा कब्जाचे संरक्षण गरजेचे आहे.

१८. तुर्तातुर्त मनाई अर्जाचा विचार सकृतदर्शनी बाजुचे व्यतिरिक्त सोयीचा समतोल आणि भरुन न येण्याजोगे नुकसान या मुद्यांवर करणे आवश्यक आहे. करिता आता सोयीचा समतोल आणि भरुन न येण्याजोगे नुकसान या दोन मुद्यांचा विचार करण्यात येतो. दावा मिळकतीला ७/१२ पत्रकी प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या नावाची नोंद दिसून येते. परंतु प्रथमदर्शनी कब्जा हा वादीचा दिसून येत आहे. अशा परिस्थितीत ही शक्यता नाकारता येणार नाही की, प्रतिवादी हे पुन्हा वादीच्या कब्जास अडथळा निर्माण करतील. दाव्याची गुंतागुंत टाळण्यासाठी व नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करुन सद्यस्थितीला अर्ज मंजूर केला नाही तर वादीचे अपरिमीत नुकसान होणार आहे. याउलट हा अर्ज जर नामंजूर केला तर वादीचे नुकसान होत असलेले प्रथमदर्शनी दिसून येते. सबब वादीस होणारी गैरसोय ही प्रतिवादीच्या तुलनेत नक्कीच जास्त आहे. करिता वादीने सोयीचा समतोल त्याच्या बाजुने असल्याचे योग्यरित्या दर्शविले आहे.

१९. आता भरुन न येण्याजोगे नुकसान या तत्वाचा विचार करण्यात येतो या ठिकाणी भरुन येण्याजोगे नुकसान म्हणजे ज्या नुकसानीच्या भरपाईची मोजदाद रोख रकमेद्वारे करता येवू शकत नाही अथवा तशी मोजदाद करणे पुरेसे नाही असे नुकसान.

२०. दावामिळकतीमध्ये वादी हा शेती करतो आहे असे ज्याअर्थी वादीने प्रथमदर्शनी दाखवून दिले आहे. वादीच्या कथनानुसार नि.क्र. ४/१ वर वादीने प्रतिवादीच्या विरुध्द दाखल केलेली फौजदारी तक्रारीवरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की , प्रतिवादीने वादीच्या दावा मिळकतीमधील लिंबाचे झाड तोडून

रु.५०००/– चे नुकसान केले आहे. त्याअर्थी जर प्रतिवादीने वादीच्या कब्जा अथवा वहिवाटी अडथळा करण्याचा प्रयत्न केला तर नक्कीच वादीचा कब्जा दावामिकतीवरुन जाईल आणि त्याचे भरुन न येणारे नुकसान होवू शकते. तसेच, प्रतिवादी पेक्षा वादीचे भरुन न येण्याजोगे नुकसान होण्याची दाट शक्यता आहे. सबब, प्रतिवादीच्या तुलनेत वादीचे नुकसान भरुन न येण्याजोगे असल्याचे वादीने समाधानकारकरित्या दर्शविले आहे.

२१. वरील विवेचनाद्वारे मी निष्कर्षास आले की, वादीने सकृतदर्शनी त्याचा ताबा असल्याचे समाधानकारकरित्या दर्शविले आहे, वादीने त्याची सकृतदर्शनी बाजु दर्शविले आहे आणि त्याची भरुन न येण्याजोगे नुकसान त्याचबरोबर सोयीचा समतोल त्याच्या हक्कात असल्याचे समाधानकारकरित्या दर्शविले आहे. त्यामुळे वादी तुर्तातुर्त मनाई हुकूमाच्या अनुतोषास पात्र आहे. अनुषंगिकरित्या मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदविण्यात येते. या निष्कर्षास अनुसरुन मुद्दा क्र.४ चे निष्कर्षाकरिता मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## :: आदेश ::

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ व त्यांचे नातेवाईक, नोकर–चाकर हस्तक व त्यांच्या वतीने इतर कोणीही व्यक्तीने दावा मिळकत जमीन गट क्र. ५७७ क्षेत्र ०० हे. २९ आर मध्ये, दाव्याचा अंतिम निकाल

लागेपर्यंत कसल्याही प्रकारचा अडथळा, हस्तक्षेप करु नये असा तुर्तातुर्त मनाईहुकूमाचा आदेश देण्यात येतो.

**(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला)**

DIVYA Digitally signed by DIVYA Date: 2025.12.06 16:27:00 +0530

**(श्रीमती दिव्या सा. करभाजन)**

**दि.२८.११.२०२५** **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर चाकूर**

**C E R T I F I C A T E**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | M.B. Pathan |
| Court Name | : | Jt.C.J.J.D. & J.M.F.C., Chakur |
| Date of order | : | 28.11.2025 |
| Order signed by the Presiding officer on | : | 06.12.2025 |
| Order uploaded on | : | 06.12.2025 |